पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-44
जा.क्र.अक्षेका/11/कावि/241 /2016
दिनांक 13 / 6/2016

प्रति,

मा.श्री./श्रीम. ------------------------------
सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- 44

विषय:- अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक 15/6/2016 रोजी
दु. 12.00 वाजता आयोजित केलेबाबत.. .

**मा. महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुन ची मासिक सभा **बुधवार दिनांक 15/6/2016 रोजी दुपारी 12.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. प्रस्तुत सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, हि विनंती.

**आपली विश्वासू,**

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**

**अ प्रभाग समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक 4**

**दिनांक :- 15/6/2016** **वेळ: दुपारी 12.00 वाजता**

..........................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुन ची 2016 ची मासिक सभा बुधवार दिनांक 15/6/2016 रोजी दुपारी 12.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ] दि. 23/5/2016 रोजी घेणेत आलेल्या माहे मे 2016 चे मासिक सभेचा सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्र. 3 ] कायम करणे

ब ] माहे मार्च 2016 चे मासिक सभेच्या सभावृत्तांत मधील ठराव क्रमांक ७१ विषय क्रमांक ०७ मध्ये प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील भिमाशंकरनगर येथील रस्ता , चौक व कॉलनी संबंधी नमुद केलेल्या नामकरण ठरावास मान्यता देण्यात आली याऐवजी **प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील भिमाशंकरनगर येथील शेवटच्या बसस्टॉप जवळील चौकास " श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणेबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणे.**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा. प्रसाद शंकर शेट्टी, सदस्य यांचा दिनांक १३/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ. सो.६.०० मीटर रुंद रस्त्यास " हस्तीमल शेठ गादिया मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.<br>(दिनांक 8/6/2016 रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक २ | मा.संगिता भोंडवे, सदस्या यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>शुभारंभ कॉलनी, स.नं.( १३१/२ व १३०/१ मधील ) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत मान्यता देणेबाबत.<br>( दिनांक 8/6/2016 रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे ) |
| विषय क्रमांक ३ | मा. चारुशीला प्रभाकर कुटे, सदस्या यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील रस्त्याचे नामकरण ठराव करणेबाबत.<br>प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत |

| | |
|---|---|
| | विचार करणे.(दिनांक 8/6/2016 रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक ४ | मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.<br>रावेत बीआरटीएस रोडवरती श्री.बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलका शेजारील चौकास कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक व सोनटक्के वस्ती , स.नं. १२/५ रावेत या ठिकाणी यशवंतनगर, सोनटक्के वस्ती असे नामकरण करणेबाबत.<br>(दिनांक 8/6/2016 रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक ५ | अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.16 आकुर्डी गावठाण मध्ये शुभश्री रेसिडन्सी या ठिकाणी 750 फ्लॅटची सोसायटी आहे. सोसायटीचे बाहेरील रस्त्याचे दोन्ही बाजूला नागरीक वाहने पार्क करीत असल्याने सोसायटी मधील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो तसेच दररोज ट्रॅफीक जाम होत आहे. ट्रॅफिक जाममुळे बस सोसायटीचे गेट जवळ येतच नाही. त्यामुळे रस्त्याचे दोन्ही बाजूला वाहन नो पार्किंग व्यवस्था करणेकामी सोसायटीचे नागरीक सतत मागणी करीत आहे. रस्त्याचे दोन्ही बाजूला नो पार्किंग करणेकामी सन 2013 मध्ये मा.विश्वास पांढरे, पुणे शहर पोलिस उपायुक्त यांनी वाहतूक विभागाला पत्र दिले होते, परंतु यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही.<br>तरी प्रभाग क्र.16 आकुर्डी गावठाण मध्ये शुभश्री रेसिडन्सी या ठिकाणी बाहेरील रस्त्याचे फुटपाथचे एकाच बाजूला नो पार्किंग व्यवस्था होईल अशा पध्दतीने नो पार्किंग चे बोर्ड लावणेकामीचा विषय जुन 2016 चे अ प्रभाग समितीचे मासिक सभेत मान्यतेकामी ठेवणेत यावा. |
| विषय क्रमांक ६ | **मा. सभापती** यांचे पुर्वपरवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणे. |

**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव (सभाशाखा)**
**अ प्रभाग समिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44
क्रमांक अक्षेका/11 /कावि/241 /2016
दि. 13 /6/2016